**प्रेस नोट दि.२०/०३/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,**

**<u>पाहिजे आरोपीस जेलबंद केले</u>.**

फरासखाना पोलीस स्टेशनकडील पोलीस हवालदार यांना त्यांचे बातमी दाराने बातमी दिली की, सन २०१८ चे एप्रील महिन्याचे शेवटच्या आठवडयात सिटी पोष्टाजवळील बस स्टॉपवर उभ्या असलेल्या इसमाचा मोबाईल पळवुन घेवुन जाणारा आरोपी नामे संतोष मिरेकर याचा साथीदार नामे दिग्या पुर्ण नाव माहित नाही रा. वडारवाडी हा वसंत टॉकिज समोरील बस स्टॉपवर उभा असुन तो अंगाने मध्यम, रंगाने काळासावळा असुन त्याने अंगात निळे पांढरे पट्टे असलेला शर्ट व जिन पँट घातलेली आहे. सदरची बातमीच्या अनुषंगाने पोलीस हवालदार आढाव व तपास पथकातील इतर पोलीस कर्मचारी असे सर्वजण दोन वेगवेगळया टिम बनवुन वसंत टॉकिज समोरील बस स्टॉपवर जावुन आडोशाला थांबुन पाहणी करता तेथे बातमीतील वर्णनाप्रमाणे एक इसम थांबलेला दिसला.पंचाची व आमची खात्री होताच त्याचेवर अचानक झडप घालुन त्यास ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.सुहास बावचे,परिमंडळ-१,पुणे शहर व मा.प्रदिप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे शहर, किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आढाव व त्यांचे पथकाने केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे